**राज्याचे बीच शॅक्स धोरण जाहीर करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टिडीएस २०२०/०२/प्र.क्र.१३८/ पर्यटन**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १७ ऑगस्ट, २०२०

**संदर्भ:** पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शा.नि.क्र.टिडीएस-२०१५/११/प्र.क्र.१०२१/पर्यटन, दि.४.५.२०१६

**प्रस्तावना :-**

राज्य शासनाने दि. ४ मे, २०१६ च्या शासन निर्णयान्वये "महाराष्ट्र पर्यटन धोरण २०१६" घोषित केले आहे. या धोरणामध्ये समुद्र किनारा पर्यटनांतर्गत (Beach Tourism) "राज्यातल्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यावरणपूरक अशी तात्पुरती बांधकामे करण्यासाठी पर्यटन विभाग विशेष परवाने देईल. ही बांधकामे पर्यावरणपूरक आणि सी.आर.झेडची पूर्तता करणारी (Eco-Friendly and CRZ compliant) असणे आवश्यक आहे. ही बांधकामे शॅक्स, पोर्टेबल केबिन इ. स्वरुपातील असू शकतील" असे नमूद करण्यात आले आहे. तसेच विधीमंडळात उपस्थित झालेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने राज्याचे बीच शॅक्स धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.

२. पर्यटन धोरणांतर्गत उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने राज्यातील समुद्रकिनाऱ्यांवर सुनिश्चित ठिकाणांवर तात्पुरत्या हंगामी स्वरुपात चौपाटी कुटी (Beach Shacks), आरामखुर्ची (Deck-beds), छत्र्या आणि सार्वजनिक सुविधा केंद्र (Comman Beach Facility Centre) उभारण्यासाठी परवानगी देण्याकरीता अटी आणि शर्ती विहित करण्याचे प्रस्तावित होते. त्यानुसार राज्यातील समुद्रकिनाऱ्यांस भेट देणाऱ्या पर्यटकांना विश्रांती, आहार तसेच सार्वजनिक प्रसाधनगृहे, स्नानगृहे, इ. सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने राज्याचे "बीच शॅक्स" धोरण जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

**राज्यातील समुद्र किनाऱ्यालगत शासकीय आणि खाजगी जमिनीवर आरामखुर्च्या आणि मोठ्या छत्रीसह तात्पुरत्या हंगामी चौपाटी कुटया, सार्वजनिक चौपाटी सुविधा केंद्र उभारण्यासाठीचे पर्यटन धोरण:-**

अ. **शासकीय जमिनीवर आराम खुर्च्या व मोठ्या छत्रीसह तात्पुरत्या हंगामी चौपाटी कुटी उभारण्यासाठीच्या अटी व शर्ती :-**

१. निश्चित केलेल्या चौपाटी क्षेत्रावर निर्देशीत ठिकाणी चौपाटी कुटी उभारण्यासाठी परवाना देण्यात येईल.

२. महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाच्या (MCZMA) सहमतीने पर्यटन संचालनालयाने निश्चित केलेल्या चौपाटी क्षेत्रावर फक्त चिन्हांकित स्थानावरच तात्पुरती चौपाटी कुटी उभारण्यासाठी परवाना देण्यात येईल.

३. पहिल्या वर्षी, महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने मंजूर केलेल्या योजनेनुसार रत्नागिरी (गुहागर, आरेवारे), सिंधुदुर्ग (कुणकेश्वर, तारकर्ली), रायगड (वर्सोली, दिवेआगार), पालघर (केळवा व बोर्डी) या ८ किनारपट्टींवर (प्रत्येक जिल्हयाच्या २ किनारपट्टया याप्रमाणे) या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल. समुद्र किनाऱ्यांची यादी आणि अर्जाचा नमुना http://www.maharashtratourism.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. दुसऱ्या वर्षापासून, पर्यटन विभागाच्या पूर्वपरवानगीने इतर योग्य चौपाट्यांवर या धोरणाची टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येईल.

४. समुद्र चौपाटीसाठी परवानगी दिलेल्या चौपाटी कुटींपैकी (कमाल मर्यादा १०), चौपाटी कुटी वाटप करताना जिल्ह्यातील अनुभवी स्थानिक उद्योगधंदा करणाऱ्या संस्था/व्यक्ती यांना प्राधान्य दिले जाईल. सर्व कुटयांचे वाटप जाहिरातीव्दारे आणि पारदर्शक संगणक पध्दतीने करण्यात येईल.

५. प्रत्येक चौपाटीवर फक्त १० कुटयांचे वाटप करण्यात येईल आणि दोन कुटींमधील अंतर किमान १० मिटर इतके असले पाहिजे.

६. सर्व चौपाटी कुटयांमध्ये निर्माण होणाऱ्या रोजगारामध्ये स्थानिक व्यक्तीसाठी ८० टक्के जागा राखीव असतील. -स्थानिक व्यक्ती॰ म्हणजे “त्या जिल्हयातील सर्वसाधारण वास्तव्य करणारी व्यक्ती” असे समजण्यात येईल.

७. निश्चित करण्यात आलेल्या चौपाटी क्षेत्रावर उभारण्यात येणाऱ्या तात्पुरत्या चौपाटी कुटी नियतवाटपासाठी विहित नमुन्यातील अर्ज जनतेकडून मागविण्यात येतील. एका कुटुंबातील एकाच सदस्याला एक चौपाटी कुटी उभारण्यासाठी परवाना देण्यात येईल.

८. **परवाना कालावधी** - चौपाटी कुटयांचे ३ वर्षाकरिता वाटप करण्यात येईल.

स्पष्टीकरण: या कलमाच्या प्रयोजनार्थ, “कुटुंब” यामध्ये, पती किंवा पत्नी, त्यांच्यावर अवलंबून असणारे माता-पिता आणि अविवाहित मुले, यांचा समावेश असेल. परंतु अर्जदाराचे नांव ज्या शिधापत्रिकेमध्ये आहे, त्याच शिधापत्रिकेत त्यांची नावे असली पाहिजेत.

९. चौपाटी कुटी वाटपग्राही विरुद्ध, त्याने चौपाटी कुटी मिळविण्याकरिता या धोरणाचे उल्लंघन केल्याची तक्रार कागदोपत्री पुराव्यानिशी पर्यटन संचालनालयाकडे प्राप्त झाल्यास, तक्रारीची शहानिशा करुन, अशा वाटपग्राहीस देण्यात आलेला परवाना तात्काळ रद्द करण्यात येईल आणि

कोणतीही नोटीस न देता सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. अशा चौपाटी कुटीचे प्रतिक्षा यादीतील पुढील अर्जदारास पुनर्वाटप करण्यात येईल.

१०. चौपाटी कुटी वाटपग्राही, कुटीमध्ये काम करण्यासाठी कुशल आणि प्रशिक्षित कर्मचारी ठेवु शकेल.

११. चौपाटी कुटी फक्त परवान्यामध्ये निर्देशिलेल्या आणि पर्यटन संचालनालयाने तयार केलेल्या स्थळ नकाशात नेमून दिलेल्या आणि वाटपग्राहीला प्रत्यक्ष जागेवर जाऊन दाखविलेल्या निर्देशीत ठिकाणावरच उभारण्यात येईल.

१२. यशस्वी चौपाटी कुटी वाटपग्राही पर्यटन संचालनालयाकडून परवाना मिळविल्यानंतरच चौपाटी कुटीची उभारणी करेल. मात्र इतर सर्व संबंधित विभागांकडून परवानगी/ ना- हरकत प्रमाणपत्र / परवाना मिळविल्याखेरीज चौपाटी कुटीचा वापर सुरू करता येणार नाही. याबाबतच्या अनुपालनात कसूर केल्यास देण्यात आलेला परवाना तात्काळ रद्द होण्यास पात्र असेल.

१३. चौपाटी कुटी वाटपाग्राही, ग्राहकांना अन्न, अल्पोपहार आणि इतर कोणत्याही सेवेच्या आकारासाठी रितसर छापील पावती देईल.

१४. अयशस्वी अर्जदार कोणतीही अवैध चौपाटी कुटी उभारणार नाही. तसे केल्यास, त्याच्या / तिच्या जोखमीवर आणि स्वखर्चाने ते बांधकाम पाडण्यात येईल. तसेच पर्यटन संचालनालयाकडून अयशस्वी अर्जदाराद्वारे भरण्यात आलेली रक्कम जप्त करण्यात येईल आणि त्याला/तिला काळ्या यादीत टाकून तीन वर्षाकरिता अर्ज करण्यास प्रतिबंध करण्यात येईल.

१५. चौपाटी कुटी वाटपग्राही संरचनेस अग्नी सुरक्षा कवच आणि पर्यटकांना प्रथमोपचार पुरविण्याची तरतुद करेल आणि त्यासंदर्भात मार्गदर्शन मिळविण्यासाठी अग्निशमन सेवा कार्यालयाशी संपर्क साधेल.

१६. चौपाटी कुटी वाटपग्राही पक्षी व प्राणी यांच्या संरक्षणाची खातरजमा करेल. पर्यटकांना पक्षी, प्राणी आणि अन्य स्थानिक जनावरांना खाद्यपदार्थ घालण्याची मुभा असणार नाही. वाया गेलेल्या आणि खरकट्या अन्न पदार्थांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावली जात आहे आणि ते वन्यजीवांना अन्न म्हणून देण्यात येणार नाही याची खबरदारी चौपाटी कुटी वाटपग्राही घेईल.

१७. समुद्री कासव किंवा देवमासे यांसारखे कोणतेही सस्तन जलचर किंवा किनारी प्राणी चौपाटी कुटी वाटपग्राहीच्या दृष्टीस पडल्यास त्याची माहिती तो वन विभाग व पर्यटन विभागास देईल.

१८. चौपाटी कुटी वाटपग्राही, अन्नपदार्थ आणि पेय देण्यासाठी जैवविघटनशील ताटे, पेले, डबे यांचा वापर करील. विशेष करून त्या त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या स्त्रोतांपासून बनवलेल्या

जैवविघटनशील साहित्याच्या (उदा. सुपारीच्या पानांपासून बनविलेली ताटे व वाट्या) वापरास प्रोत्साहन देईल.

१९. देण्यात आलेला परवाना नियत वाटपाच्या आदेशानुसार असलेल्या कालावधीपर्यंतच वैध असेल आणि त्या विशिष्ट पर्यटन हंगामापुरते १ सप्टेंबर ते ३१ मे या कालावधीसाठीच तात्पुरती संरचना उभारण्यास परवानगी देण्यात येईल. दिलेला परवाना हा अन्न व औषध प्रशासन, विद्युत, अग्नीशामक विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड आणि लागू असतील अशी इतर संबंधित प्राधिकरणे यांसारख्या विभागांकडून वाटपग्राहीने मिळविण्याच्या आवश्यक परवानग्यांच्या अधीन असेल.

२०. पर्यटन संचालनालयाकडून परवाना देण्यात आला आहे केवळ अशा चौपाटी कुटयांनाच संबंधित विभाग परवाना देतील. अशी कुटी वाटप केलेल्यांची यादी संबंधित विभागांना पाठविण्यात येईल.

२१. अवैध चौपाटी कुटया /अवैध आरामखुर्च्या उभारणीस प्रतिबंध करण्यासाठी, स्थानिक पोलीस किनाऱ्यांवर कडक निगराणी ठेवतील, त्यांच्या अधिकारितेखाली असणाऱ्या किनाऱ्यांवर फेरीवाले, मालीशवाले, भटके आणि अंमली पदार्थांचे विक्रेते यांना व्यवसाय करण्याची मुभा देण्यात येणार नाही.

२२. <u>सार्वजनिक किनाऱ्यांवरील</u> चौपाटी <u>कुट्यांचा आकार व त्यांची संख्या</u> - फक्त गाळयासाठी (किचनसह) दुकान असणाऱ्या चौपाटी कुटीचा आकार १५ फुट (लांबी) x १५ फूट (रूंदी) एवढा असेल आणि छतावर लावण्यात येणाऱ्या फलकाच्या उंचीसह चौपाटी कुटीची उंची जास्तीत जास्त १२ फूट असेल, गाळ्याच्या समोर खुर्च्यांसह टेबले, अशा बैठक व्यवस्थेसाठी २० फूट लांब आणि १५ फूट रूंद इतक्या क्षेत्रास वरून छत घालण्यास मान्यता देण्यात येईल. विनिर्दिष्ट केलेल्या आकारापेक्षा अधिक आकाराच्या कोणत्याही चौपाटी कुटीस परवानगी देण्यात येणार नाही. कोणत्याही चौपाटीकुटीस पोटमाळा किंवा अतिरिक्त मजल्यास परवानगी देण्यात येणार नाही. चौपाटीकुटीचा आकार, प्रत्यक्ष बांधकामा एवढाच उदा. जमिनीवर प्रत्यक्ष (व्याप्त) असलेल्या क्षेत्राएवढाच असेल, आणि त्याची मोजणी, चौपाटी कुटीच्या चारही कोपऱ्यांत उभारण्यात आलेल्या खांबांपासून करण्यात येईल. दोन्ही बाजूंच्या जोत्यापासून एक मिटर आणि समोरील बाजूपासून दोन मीटर इतक्या छताच्या कमाल विस्तारास परवानगी देण्यात येईल, मात्र, चौपाटी कुटीच्या मागच्या बाजूच्या छताचा कोणताही विस्तार असणार नाही. अनुज्ञेय असणाऱ्या आकारापेक्षा अधिक आकार असणाऱ्या चौपाटी कुट्या पाडण्यास पात्र असतील आणि त्यांची परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल. पंचनामा झाल्यावर आणि त्याचे चित्रिकरण करण्यात आल्यावर चौपाटी कुटी क्षेत्र अनधिकृतपणे वाढवण्यात आले आहे, चौपाटी कुटी पुन्हा बांधण्यात आली आहे, असे सिध्द झाल्यानंतर कोणतीही नोटीस न देता सुरक्षा अनामत रक्कमही जप्त करण्यात येईल.

**परवाना शुल्क, वार्षिक परवाना फी व सुरक्षा अनामत :-**

२३. परवान्यासाठी अर्जाचे मुल्य रू.१५,०००/- वाटपग्राहीसाठी ना-परतावा व इतरांना परतावा योग्य असेल. अर्जदाराने प्रत्येक पर्यटन हंगामाच्या सुरुवातीला फक्त एकच अर्जाचा नमुना (३ वर्षासाठी) अर्जाच्या शुल्कासह सादर करणे आवश्यक असेल. तथापि, वाटपग्राहीने दरवर्षी कुटीच्या वाटपाचे वार्षिक शुल्क भरणे गरजेचे असेल. लॉटरीप्रमाणे नंबर लागल्यानंतर दुसरा धनाकर्ष द्यावा लागेल. धनाकर्ष संचालक, पर्यटन संचालनालय यांच्या नांवे काढण्यात यावेत. धनाकर्षाशिवाय आलेला अर्ज तात्काळ फेटाळण्यात येईल. हंगामी कुटीसाठीची वार्षिक परवाना फी पुढीलप्रमाणे असेल:

| | |
|---|---|
| पहिले वर्ष | रू.४५,०००/- |
| दुसरे वर्ष | रु.५०,०००/- |
| तिसरे वर्ष | रू.५५,०००/- |

वार्षिक चौपाटी कुटी शुल्क पहिल्या वर्षात लॉटरीप्रमाणे वाटप आदेश मिळाल्यानंतर आणि इतर २ वर्षाकरिता उशिरात उशिरा १५ सप्टेंबर पर्यंत भरण्यात यावे. चौपाटी कुटी वार्षिक शुल्क न भरल्यास, वाटपग्राहीस वाटप करण्यात आलेल्या जागेवर चौपाटी कुटी उभारण्यास परवानगी देण्यात येणार नाही. चौपाटी कुटीच्या वाटपग्राहीने संबंधित वर्षाच्या १५ सप्टेंबर या तारखेपर्यंत वार्षिक शुल्क न भरता चौपाटी कुटी उभारण्यात आल्याचे आढळून आल्यास, चौपाटी कुटी कोणतीही नोटीस न देता पाडण्यात येईल आणि वाटपग्राहीची सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. जर चौपाटी कुटी मिळण्यास यशस्वी झालेला वाटपग्राही, इतर सर्व आवश्यक विभागांचा परवाना, परवानगी पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत चौपाटी कुटी उभारण्यास अपयशी ठरल्यास, कोणत्याही नोटिशी शिवाय चौपाटी कुटी शुल्क जप्त करण्यात येईल.

२४. **सुरक्षा अनामत :** प्रत्येक यशस्वी अर्जदार चलनाद्वारे भरण्यात यावयाची आणि पर्यटन संचालनालयाच्या नावे शासकीय कोषागारात जमा करावयाची रू.३०,०००/- (रूपये तीस हजार फक्त) इतकी परतावा योग्य सुरक्षा अनामत जमा करेल. परवान्याचा ३ वर्षाचा कालावधी संपल्यानंतर ही अनामत रक्कम परत केली जाईल. तथापी, तत्पुर्वी ती जप्त केलेली असता कामा नये.

२५. तात्पुरत्या हंगामी संरचनेच्या उभारणीसाठीच्या पर्यटन धोरणाच्या कोणत्याही अटी व शर्तींमध्ये कसूर केल्यास किंवा त्यांचे उल्लंघन केल्यास किंवा त्यांचे अनुपालन न केल्यास किंवा प्रचलित कायद्यांतर्गत प्रतिबंधित आहे अशा इतर कोणत्याही अटीचा भंग केल्यास, कोणत्याही नोटिशी शिवाय, अर्जदाराकडून जमा करण्यात आलेली सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. अशा प्रकारे वाटप करण्यात आलेली तात्पुरती चौपाटी कुटी उभारण्यासाठीचा परवाना पुढे चालू ठेवण्यासाठी वाटपग्रहीने तेवढ्याच रकमेची नवीन सुरक्षा अनामत १० दिवसांच्या आत पुन्हा भरणे आवश्यक आहे, तसे न केल्यास अशा पध्दतीने देण्यात आलेला परवाना, चौपाटी कुटी वाटपग्राहीला

कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल. वाटपग्राहीने परवाना कालावधीच्या प्रत्येक वर्षी अधिकतम १० जून पर्यंत कुटी जागेवरुन हटवली पाहीजे व जमीन आहे त्या मूळ स्थितीत परत केली पाहिजे. संबधीत पर्यटन उपसंचालककाकडून याबाबत उशिरात उशिरा ३० जून पर्यंत कुटी निष्कासन झाल्याचे प्रमाणपत्र दिले पाहीजे. वाटपग्राहीने कुटी काढून टाकण्यास व उपसंचालककाकडून प्रमाणपत्र प्राप्त करण्यास कसूर केल्यास, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मदतीने, अर्जदाराच्या खर्चाने व त्याच्या जोखमीवर स्थानिक पोलीसांच्या साहाय्याने महसूल विभागाच्या नायब तहसीलदार यांच्या पथकाद्वारे कुटी पाडण्यात येईल आणि अशा प्रकारे पाडण्यासाठी झालेला खर्च अर्जदाराकडून वसूल करण्यात येईल. प्रत्येक वर्षीच्या निष्कासित प्रमाणपत्रासह ३ वर्षाच्या शेवटी वाटपग्राही सुरक्षा अनामत परत मिळणेसाठी अर्ज करेल. प्रमाणपत्रासह अर्ज मिळाल्यापासून ६० दिवसाच्या आत सुरक्षा अनामत रक्कम परत दिली जाईल.

२६. चौपाटी कुटी बांबू /लाकडी खांब/ तसेच छतासाठी माडाच्या झावळ्या, बांबूची चटई यासारख्या पर्यावरणपूरक साहित्यापासून उभारण्यात येईल. वाटपग्राहीस कुटीसाठी पोर्टा केबीनचा वापर करता येईल किंवा पर्यावरण विभागाने सुचविलेल्या अन्य साहित्यापासून कुटी बनविता येईल. तथापि, कुटी बनविण्यासाठी क्राँक्रिटच्या साहित्याच्या वापरास पूर्ण मनाई असेल.

महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकारणाद्वारे जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार मळलेला चुना वापरण्यास, गिलावा देण्यास, लादी वर/संरचनेवर पीसीसी /आरसीसी लावण्यास/मुरवण्यासाठी खड्डा खणणे/पाईपसाठी खड्डा खणणे व त्यात पाईप बसविणे/ धातूचा जिना बसविणे, सिमेंटमध्ये चुना मिसळणे इत्यादी गोष्टींना परवानगी असणार नाही. कुटी निर्मितीसाठी प्रमाणीकृत संकल्पचित्र, निश्चित करणे आणि उपरोक्त पैकी एका साहित्याची निवड करणे, याबाबत मार्गदर्शक तत्वे जारी करण्याचा हक्क केवळ पर्यटन संचालनालयास असेल. या प्रयोजनासाठी, पर्यटन संचालनालय, संकल्पचित्र व साहित्य यांची निवड करण्यासाठी तज्ञ व्यक्तींचा सल्ला घेईल आणि संकल्प चित्रानुसार कुटी उभारण्यासाठी नियुक्त प्रकल्प सल्लागार/ वास्तुविशारद यांची मान्यता घेईल.

२७. जर कुटी वाटपग्राहीने परवानगी देण्यात आलेल्या वस्तू / साहित्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अतिरिक्त वस्तू / साहित्य चौपाटी किनाऱ्यावर वापरल्याचे आढळून आल्यास त्या वस्तू / साहित्य पर्यटन संचालनालयाद्वारे जप्त करण्यात येतील. त्याचा लिलाव करणे / त्याची विल्हेवाट लावणे हा पर्यटन संचालनालयाचा स्वेच्छानिर्णय असेल. अशी कुटी परवाना रद्द करण्यास देखील पात्र असेल.

२८. यशस्वी चौपाटी कुटी वाटपग्राहींची यादी खाली नमूद केलेल्या संबंधित अधिकारी/विभागांना कळविण्यात येईल:-

(१) तहसीलदार

(२) स्थानिक पोलीस स्थानक प्रमुख

(३) कार्यकारी अभियंता, महावितरण
(४) ग्रामपंचायत सरपंच/ मुख्य अधिकारी, नगरपरिषद
(५) निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन
(६) अग्निशमन केंद्र प्रमुख
(७) सदस्य सचिव, महाराष्ट्र किनारपट्टी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण
(८) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
(९) निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क
(१०) बंदर अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड.

यशस्वी चौपाटी कुटी ग्राहींची यादी पर्यटन विभागाच्या संकेत स्थळावर टाकण्यात येईल. संबंधित विभागाकडून कोणत्याही प्रकारचा उशीर न करता अर्जदारांची परवाना /ना हरकत प्रमाणपत्रे यांचा निपटारा लवकरात लवकर करण्यात येईल. जे परवाने लोकसेवा तक्त्यामध्ये अधिसुचनेमध्ये नसतील अशाकरिता आवश्यक कागदपत्रांचे अनुपालन पूर्ण केल्यापासून तीस दिवसांच्या आत संबंधित विभागाने परवाना / नाहरकत संबंधीतांना देणे बंधनकारक असेल. विहीत कालावधीत परवाना न दिल्यास तो परवाना दिला आहे असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल. याबाबत उपसंचालक, पर्यटन संचालनालय, कोंकण विभाग हे नोडल अधिकारी असतील व ते वाटपग्राहीस परवाना मिळविण्यासाठी विहीत पध्दतीने सहाय्य करतील.

२९. एकदा का हंगाम संपला की, कुटी काढून टाकण्यात येईल आणि परवानगी समाप्ती झाल्यापासुन दहा दिवसांच्या आत (तात्पुरता वीज पुरवठा, पाणी जोडणी दिलेली असल्यास खंडित करणे यासहित) स्वयंपाकघरातील वापरण्यात आलेले सर्व साहित्य काढून टाकण्यात येऊन ते क्षेत्र रिक्त करण्यात येईल आणि त्या ठिकाणी कोणतेही घाण / निरूपयोगी साहित्य न ठेवता ती जागा स्वच्छ करण्यात येईल. जर वाटपग्राही १० दिवसांच्या आत बांधकाम काढून टाकण्यात कसूर करील तर त्याचा / तिचा चौपाटी कुटी करिताचा अर्ज तीन वर्षाच्या कालावधीसाठी नाकारण्यात येईल. जर कोणत्याही प्रतिकूल हवामान स्थितीमुळे किंवा चौपाटी किनारी संरक्षणाच्या कारणामुळे अथवा जनहिताचे असे कोणतेही काम / उपक्रम पुढे चालू ठेवणे आवश्यक असल्यास पर्यटन संचालनालयास विनिर्दिष्ट तारखेपूर्वी अशा कोणत्याही कुटीची दिलेली परवानगी काढून घेता येईल आणि अशा प्रकरणांत वाटपग्राही परवानगीधारक कोणत्याही नुकसान भरपाईस पात्र ठरणार नाही.

३०. नेमून दिलेल्या कुटीच्या जागेच्या आत अन्न तयार करण्यास व अन्न पदार्थाची विक्री करण्यास मुभा असेल मात्र, बाहेरील परिसरात तशी मुभा नसेल. तसेच कॉफी / चहा यांचे यंत्र, ओव्हन तसेच पेयांच्या साठवणीकरिता शीतकपाट (फ्रीज) ठेवण्याची मुभा असेल. चौपाटी कुटीमध्ये आणि तिच्या सभोवतालच्या परिसरात आरोग्यदायी व स्वच्छ वातावरण ठेवणे (कुटीच्या

चोहोबाजूंनी ५ मीटरपर्यंत) ही कुटी वाटपग्राहीची जबाबदारी असेल. कुटी वाटपग्राही स्थानिक खाद्यपदार्थ पर्यटकांना उपलब्ध करून देण्यासाठी आग्रही असला पाहिजे.

३१. वाटपग्राहीस राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून (फॉर्म ई किंवा फॉर्म ई२) हा परवाना घेऊन पर्यटकांना कुटीमध्ये सौम्य बियर किंवा वाईन देता येईल.

३२. वाटप झालेली कुटी कोणत्याही परिस्थितीत पोटभाड्याने देता येणार नाही. कुटी पोटभाड्याने दिल्याचे कागदोपत्री पुराव्यानिशी सिध्द झाले तर त्याच वेळी ती निष्कासीत करण्यात येईल आणि प्रतिक्षा यादीतील पुढच्या अर्जदाराला तिचे वाटप करण्यात येईल व कोणतीही सूचना न देता सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. वाटप झालेली चौपाटी कुटी पर्यटन संचालनालयाच्या अधिकाऱ्यांकडून अनपेक्षित तपासणीच्या अधीन असेल आणि जर लागोपाठ तीन तपासणीदरम्यान वाटपग्राही अनुपस्थित असल्याचे आढळून आल्यास, असे गृहीत धरले जाईल की, ती कुटी पोटभाड्याने देण्यात आली आहे आणि कुटीचा परवाना रद्द करण्यात येईल तसेच कुटी वाटपग्राहीस कुटीच्या वाटपासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

३३. सार्वजनिक चौपाटी कुटीच्या अर्जदाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी किंवा एखाद्या अपराधासाठी त्याच्यावर दोषारोप ठेवलेला नसावा आणि भारतातील कोणत्याही फौजदारी न्यायालयात त्याच्याविरोधात कोणतेही दोषारोपपत्र प्रलंबित नसावे. ज्यांच्याविरूध्द भारतातील कोणत्याही न्यायालयात गुन्हेगारी दोषारोपपत्र प्रलंबित आहेत, अशा व्यक्तींकडून तात्पुरती कुटी उभारण्यासाठी प्राप्त झालेले सर्व अर्ज फेटाळण्यात येतील.

३४. चौपाटी कुटी वाटपग्राही घाणेरडे पाणी, द्रव पदार्थ, सांडपाणी, ओला कचरा किंवा कोणता सुका कचरा समुद्रकिनाऱ्यावर किंवा तेथील वाळूमध्ये टाकणार नाही. कुटी वापरग्राहीने विघटनशील कचरा आणि अविघटनशील कचरा वेगळा ठेवण्यासाठी किमान चार कचरा कुंड्या ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक वाटपग्राही भांडी धुणे इत्यादीमुळे निर्माण झालेले सांडपाणी जमा करण्याकरिता स्वतंत्र भांडे (कंटनेर) ठेवील. संबंधित ग्राम पंचायत / नगरपालिका यांनी त्या ठिकाणाचा कचरा गोळा करुन त्याची विल्हेवाट करावी याकरिता संबंधित ग्रामपंचायती / नगरपालिकेने निश्चित केलेली योग्य रक्कम वाटपग्राही अदा करेल. पर्यटन संचालनालय बेकायदेशीररीत्या कचऱ्याची विल्हेवाट लावणाऱ्यांवर दंड आकारील आणि (अ) कचरा कुंड्या न ठेवणे (ब) कचऱ्याची योग्यप्रकारे विल्हेवाट न करणे (क) चौपाटी क्षेत्राच्या आसपाचा भाग किंवा कोणत्याही भागात / ठिकाणी बेकायदेशीर कचरा टाकणे / पुरणे या बाबींसाठी वाटपग्राहीचा परवाना देखील रद्द करील. कचरा टाकण्यासाठी ५० लिटर आकाराच्या काळा ( सुका कचरा), हिरवा ( ओला कचरा) आणि निळा (प्लास्टिक) अशा रंगाच्या स्वतंत्र कचराकुंडया निर्देशित क्षेत्रांमध्ये ठेवाव्यात. सर्व चौपाटी कुटी वाटपग्राही समुद्र किनाऱ्यावर गरजेनुसार अतिरिक्त कचराकुंड्या ठेवू शकतील.

३५. चौपाटी कुटी उभारण्यासाठी संबंधित ग्राम पंचायत / नगरपालिकेची परवानगी प्राप्त करण्यात येईल आणि वाटपग्राहीला नियमानुसार देय असलेला स्थानिक संस्था कर भरावा लागेल.

३६. चौपाटी कुटी वाटपग्राहीकडून कुटी सभोवतालचे क्षेत्र स्वच्छ ठेवण्यात यावे. कोणत्याही स्वरूपातील टाकाऊ वस्तू / कचरा जाळण्याची किंवा पुरण्याची मुभा असणार नाही. जर कोणतीही घाण / कचरा, जळाऊ लाकूड कोळसा इत्यादी कुटीच्या मागे किंवा जवळपास आढळल्यास कुटीचा परवाना त्वरित रद्द होण्यास पात्र असेल आणि चौपाटी कुटी वाटपग्राहीच्या जोखमीवर व त्याच्या खर्चाने कुटी पाडण्यात येईल. कोणत्याही प्रकारचा कचरा झुडपांमध्ये, वनस्पतींमध्ये (शेवाळ) किंवा वाळूच्या टेकडीवर पुरला / जाळला जाणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी कुटी वाटपग्राहीची असेल. कुटी मालक, संबंधित ग्राम पंचायतीने / नगरपालिकेने नियुक्त केलेल्या समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता करणाऱ्या कंत्राटदाराकडे/ सफाई कर्मचाऱ्याकडे वेगवेगळा केलेला ओला व सुका कचरा देईल आणि त्यासाठी एक उचित रोजवही ठेवील व त्यात दैनंदिन नोंदी करील. स्थानिक संस्थांच्या या सेवांकरिता पर्यटन विभाग प्राप्त झालेल्या परवाना शुल्काची १० टक्के रक्कम त्यांना हस्तांतरित करील. या व्यतिरिक्त संबंधित ग्राम पंचायत/ नगरपालिका यांना वाटपग्राहीकडून घनकचरा व्यवस्थापनाच्या कामासाठी वाजवी शुल्क आकारण्याचा हक्क असेल.

३७. चौपाटी कुटी वाटपग्राहीस अन्न पदार्थांची यादी / दरांचा समावेश असलेले ४ फूट x ५ फूट आकाराचे दोन खाद्यपदार्थ दरपत्रक कुटीच्या आत प्रदर्शित करण्याची मुभा असेल. कोणत्याही परिस्थितीत कुटीच्या बाहेर किंवा कुटीच्या छतावर कोणतेही दरपत्रक फलक / जाहिरात फलक लावण्याची मुभा असणार नाही. याचे उल्लंघन केल्यास असा फलक सरकारजमा करण्यात येईल आणि सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल. कोणत्याही कुटीवर कोणत्याही उत्पादनांच्या जाहिराती करण्याची परवानगी असणार नाही आणि याचे उल्लंघन झाल्यास सुरक्षा अनामत जप्त होईल आणि परवाना रद्द करण्यात येईल.

३८. चौपाटी कुटीसमोर केवळ १० आरामखुर्च्या ठेवण्याची आणि पाच मोठ्या छत्र्या उभारण्याची मुभा असेल. आरामखुर्च्या भरती रेषेपासून १० मीटरच्या क्षेत्राबाहेर काटेकोरपणे ठेवण्यात येतील आणि पर्यावरण मंत्रालय, वन व हवामान बदल मंत्रालयाने (भारत सरकार) वेळोवेळी काढलेल्या अधिसूचनांचे काटेकोरपणे पालन करावे लागेल. छत्र्यांसहित आरामखुर्च्या ठेवण्यासाठी क्षेत्र निश्चित असेल.

३९. चौपाटी कुटी वाटपग्राही कोणत्याही व्यक्तीला कुटीमध्ये प्रवेश करण्यासाठी राष्ट्रीयत्व, लिंग, जात, धर्म किंवा अशा इतर कोणत्याही घटकाच्या आधारे कोणताही भेदभाव करणार नाही. अशा प्रकारे भेदभाव केल्याची तक्रार आढळल्यास त्या प्रकरणी विहित पडताळणीनंतर ती वैध ठरल्यास (कुटी) वाटप रद्द होण्यास पात्र असेल.

४०. विहित जागेची स्थिती / उपलब्धता या आधारे कुटीचे सीमांकन करण्यासंबंधात परिस्थितीनुरुप निर्णय घेण्याचा अधिकार पर्यटन संचालनालयाकडे राखून ठेवण्यात आला आहे.

४१. कोणत्याही विदेशी व्यक्तींकडे कामाबाबतचा आवश्यक व्हिसा असला तरी तिला कोणत्याही कुटीत कामावर ठेवण्याची परवानगी दिली जाणार नाही.

४२. प्रत्येक कुटी वाटपग्राहीने धूम्रपान करू नका व थुंकू नका. "तंबाखूला नकार, आरोग्याला होकार" "चौपाटी स्वच्छ व प्लॉस्टीक मुक्त ठेवा" असा मजकूर असलेला फलक कुटीच्या आत दिसेल असा अनिवार्यपणे लावावयाचा आहे आणि महाराष्ट्र राज्याच्या संबंधित अधिनियम व इतर केंद्रीय अधिनियमांचे पालन करील.

४३. चौपाटी कुटी सुरू ठेवण्याची वेळ सकाळी ०७.०० ते सायंकाळी ७.०० अशी असेल. संगीताचा आवाज केवळ कुटीच्या आतच ऐकू येईल, आजूबाजूच्या कुटीधारकांस त्यामुळे कोणताही त्रास होणार नाही अशा प्रकारे संगीत लावण्यात येईल. केवळ प्रत्येकी १२.५ वॅटस आर एस क्षमतेच्या दोन ध्वनीक्षेपकास परवानगी असेल, २५ वॅट आरएमएस पेक्षा अधिक क्षमतेच्या ध्वनिक्षेपकास मनाई आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकाप्रमाणे शर्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल, उपरोक्त मर्यादेपेक्षा अधिक क्षमतेचे ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धके असलेले कोणतेही संगीत साहित्य सरकार जमा केले जाईल. जिल्हा दंडाधिकारी व पोलीस अधीक्षक हे एकत्रितपणे नियम व विनियमानुसार त्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे ३१ डिसेंबर,नाताळ किंवा अन्य कोणत्याही कार्यक्रम, उत्सवानिमित्त मागणी केल्यास नियमित वेळ वाढवून देऊ शकतील.

४४. चौपाटी कुटीतील घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक कुटीचा वाटपग्राही सीसीटीव्ही कॅमेरा असेलेली टेहळणी यंत्रणा अनिवार्य पणे बसवून घेईल. अशाप्रकारे बसवलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये व्हिडिओचित्रण केलेल्या चित्रणांवर यथार्थ तारीख व वेळ प्रदर्शित झालेली असावी. कुटी वाटपग्राही संपूर्ण हंगामाचे सीसीटीव्ही फुटेज परिरक्षित करील सीसीटीव्ही चित्रण कुटीच्या संपूर्ण दैनंदिन कार्यवेळेपर्यंत चालू असले पाहिजे. सीसीटीव्ही चे चित्रीकरण होताना पर्यटक आरामखुर्चीत असतानाचा त्याच्या / तिच्या खाजगी जीवनाचा भाग चित्रित केला जाणार नाही याची दक्षता वाटपग्राहीने घेतलेली असावी.

४५. कुटीचा वाटपग्राही, वाळूच्या टेकड्या, खारफुटी आणि समुद्र किनाऱ्यावरील वाळूच्या टेकड्यांनी आच्छादलेल्या वनस्पती नष्ट होणार नाही याची यथोचित काळजी घेईल आणि त्यांचे संरक्षण व संवर्धन करील. त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यास कसूर करणाऱ्या कुटी वाटपग्राहीस चौपाटी विनियमन क्षेत्र अधिसूचना १९९१ आणि त्यापुढील अधिसूचना व सुधारणांच्या उल्लंघनासाठी जबाबदार धरण्यात येईल आणि परवानगी रद्द करून उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध विहित नियमानुसार कारवाई सुरू करण्यात येईल.

४६. केंद्रिय पर्यावरण वन व हवामान बदल मंत्रालय, पर्यावरण विभाग, एमसीझेडएमए यांनी निर्धारीत केलेल्या प्रवाळे आणि प्रवाळ असलेले खडक, वाळूच्या टेकड्या, वाळूचे पट्टे जीवशास्त्रीयदृष्ट्या सक्रीय समतल चिखल, खारपाट, कासवाची घरटी असणाऱ्या जागा, खेकडे आवास जागा, समुद्री गवती पट्टे, पक्षांची घरटी असणाऱ्या जागा आणि अशा कोणतेही

परिस्थितिकीयदृष्ट्या संवेदनशीलक्षेत्राच्या ठिकाणी कुटी उभारण्याची परवानगी असणार नाही. कुटी वाटपग्राही, घरट्यांच्या बाबतीत निदर्शनास आलेली कोणतीही बाब संबंधित कर्मचाऱ्यांना कळवील आणि कासवांचे घरटे असणाऱ्या जागांचे, कासवांची अंडी उबवण क्षेत्र इत्यादींचे संरक्षण करण्यासाठी संरक्षक कर्मचाऱ्यांना सक्रीयपणे सहकार्य करील.

४७. शासनाला बेकायदेशीर कुटया पाडून टाकण्यासाठी तसेच उर्वरित हंगामा करिता परवाना रद्द करून दंड लादण्याची शिफारस करण्यासाठी, अधिकाऱ्यांचे / कार्यकारी दंडाधिकाऱ्यांचे अधिकार असणारे स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष / भरारी पथक, स्थापन करता येईल आणि या भरारी पथकामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेतील अधिकारी ( विस्तार अधिकारी / ग्राम विकास अधिकारी / नगर पालिका मुख्य अधिकारी यांचा प्राधिकृत अधिकारी), स्थानिक पोलीस अधिकारी ( पोलीस उपनिरीक्षक / जमादार) यांचा समावेश असेल आणि तालुक्याचा नायब तहसीलदार (सामान्य) त्या पथकाचा प्रमुख असेल.

४८.यशस्वी कुटी वाटपग्राही व्यवस्थापक/ सहायक व्यवस्थापक यांची दोन नावे आणि आधारकार्डासह कुटीमध्ये काम करणाऱ्या सर्व लोकांची नावे अनिवार्यपणे सादर करील. वाटपग्राही / निर्देशित व्यवस्थापक/ सहायक व्यवस्थापक यांच्याखेरीज अन्य व्यक्ती / कुटी चालवीत / व्यवस्थापन करीत असल्याचे आढळून आल्यास, सदर कुटीस देण्यात आलेली परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल, आणि कुटीच्या वाटपग्राहीस पुढील तीन वर्षाच्या कालावधीकरिता कुटीच्या वाटपासाठी अर्ज करण्यास मनाई करण्यात येईल.

४९.चौपाटी कुटीग्राही समुद्र किनारा कचरामुक्त ठेवण्यासाठी सर्वाधिक काळजी घेईल आणि ती जबाबदारी सर्वस्वी त्याचीच राहील.

५०.चौपाटीवरील एक निर्देशीत कुटी आयुर्वेद पंचकर्म व निरोग केंद्रासाठी राखीव असेल. पर्यटन संचालनालयाच्या निदेशानुसार अशा कुटीचे देखील पारदर्शक संगणक सोडतीने वाटप करण्यात येईल.

५१.चौपाटी कुटी वाटपग्राही भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने जारी केलेल्या “सुरक्षित व जबाबदार पर्यटनाच्या आचार संहितेचे” काटेकोरपणे पालन करण्यासंबंधीची हमी सादर करील .

५२.चौपाटी कुटी वाटपग्राही समुद्रकिनाऱ्यावरील पर्यटकांचे पाण्यात डुंबणे या व्यतिरिक्त इतर जल साहसी क्रीडा व्यवसायात सहभागी असणार नाही.

५३.वाटपग्राहीने प्रचलीत अधिनियम, नियम व विनियम यांनुसार आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडून घ्याव्यात. वाटपग्राहीस सर्व परवानग्या विहित मुदतीत मिळाव्यात यासाठी पर्यटन संचालनायाकडून “एक खिडकी पध्दत” (Single Window System) राबविण्यात येईल.

ब. समुद्री किनाऱ्यावरील शासकीय जमिनीवर सार्वजनिक चौपाटी सुविधा केंद्र उभारणीसाठी परवानगी देण्याकरीता अटी व शर्ती :-

१.पर्यटन संचालनालय सार्वजनिक सुविधा केंद्रांच्या उभारणीसाठी विशेष निश्चित क्षेत्रे राखून ठेवील. सार्वजनिक सुविधा केंद्राचे स्थान हे प्राधान्याने समुद्रकिनाऱ्याच्या पोचमार्गालगतच्या प्रवेशद्वाराजवळ असेल.

२. प्रत्येक सार्वजनिक सुविधा केंद्रामध्ये किमान पुढील सुविधांचा समावेश असेल-

अ) चार प्रसाधनगृहे (Toilet blocks) (दोन पुरूषांसाठी व दोन महिलांसाठी)

ब) सहा पाणी तुषार संच (तीन पुरूषांसाठी व तीन महिलांसाठी)

क) कपडे बदलण्यासाठी सहा खोल्या (Changing Room) (तीन पुरूषांसाठी व तीन महिलांसाठी)

ड) लॉकरची सुविधा (किमान ५० कुलुपबंद पेट्या)

ई) पुरूषांसाठी व महिलांसाठी स्वतंत्र मुतारी (Urinal) व्यवस्था( प्रत्येकी पाच)

३. पर्यटन संचालनालयाला सार्वजनिक चौपाटी सुविधा केंद्रांचे प्रमाण संकल्पचित्र तयार करण्याचा व ते बनविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याचा तपशिल ठरविण्याचा हक्क असेल. पर्यटन संचालनालय तज्ञांचा सल्ला घेऊन संकल्पचित्र व साहित्य अंतिम करील.

४. सार्वजनिक सुविधा केंद्राचे वाटप पर्यटन संचालनालयाकडून पारदर्शक संगणक लॉटरी पध्दतीने करण्यात येईल. त्याचा कालावधी तीन वर्ष इतका असेल. अशी सुविधा केंद्रे चालविण्याचा अनुभव असणाऱ्या अशासकीय संघटना / व्यावसायिक संस्थांकडून सुविधा केंद्रे चालविण्यासाठी अर्ज मागविण्यात येतील.

५. अर्जाचा विहित नमुना आणि शपथपत्र पर्यटन संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल.

६. सुविधा केंद्र वाटपग्राहींनी ग्रामपंचायत/ नगरपालिका यांच्या साहाय्याने सांडपाणी व मलनिस्सारणाचा योग्य निचरा होण्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी आणि कोणतेही मलजल किंवा सांडपाणी चौपाटीवर किंवा समुद्रात सोडण्यात येऊ नये.

७. संबंधित ग्रामपंचायत / नगरपालिका यांना सार्वजनिक सुविधा केंद्राकडून सांडपाणी व मलजल यांचा निचरा करण्यासाठी वाजवी शुल्क आकारण्याचा अधिकार असेल.

८. अर्जदारास, आवश्यक कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्जासोबत सादर करतेवेळी रूपये ५०००/- इतके अर्जाचे शुल्क (ना परतावायोग्य) भरावे लागेल. अर्जदारास रू. १०,०००/- इतकी रक्कम (परतावायोग्य) सुरक्षा अनामत ठेव म्हणून भरावी लागेल. तथापि विहित नियम / निकषांचे उल्लंघन केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

९. वाटपग्राहीस वार्षिक परवाना शुल्क म्हणून रूपये १५,०००/- एवढी रक्कम दरवर्षी हंगाम सुरू होण्यापूर्वी पर्यटन संचालनालयाकडे जमा करावी लागेल.

१०. वाटपग्राहीस सार्वजनिक सुविधा केंद्रात (सीबीएफसी) विविध सोयीसुविधांचा वापर करणाऱ्यांकडून, पर्यटन संचालनालयाने वेळोवेळी निश्चित आणि सुधारित केलेल्या अटीनुसार काही कमाल मर्यादेच्या अधीन राहून शुल्क आकारता येईल.

११. सार्वजनिक सुविधा केंद्रात, पर्यटकांच्या सुरक्षिततेकरिता माफक दरात जीवरक्षक जाकीट,जीवरक्षक पटटा, दोरखंड यांसारख्या आवश्यक जीवरक्षक साधनसामुग्रीची तरतुद असेल.

१२. एकाच संबंधित चालकास सार्वजनिक सुविधा केंद्र आणि चौपाटी कुटी वाटप करण्यात येणार नाही. कोणत्याही बाबतीत वाटपग्राहीकडून / वाटपग्राहीच्या कुंटूबातील सदस्यांकडून असा अर्ज प्राप्त झाल्यास तो रद्द होईल आणि शुल्क जप्त होईल.

१३. निवड झालेल्या वाटपग्राही, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे "सुरक्षित व जबाबदार पर्यटनासाठी" काढलेल्या आचारसंहितेशी वचनबध्द असल्याबाबतचे एक हमीपत्र सादर करील.

१४. वाटपग्राहीने समुद्रकिनाऱ्याजवळील कोणत्याही साहसी क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होऊ नये.

१५. प्रचलित अधिनियम, नियम आणि विनियमांनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व त्या परवानग्या वाटपग्राहीने संबंधित सक्षम प्रधिकरणांकडून मिळवाव्यात. वाटपग्राहीस सर्व परवानग्या विहित मुदतीत मिळाव्यात यासाठी पर्यटन संचालनायकडून "एक खिडकी पध्दत" (Single Window System) राबविण्यात येईल.

**क. खासगी मालमत्तांमध्ये तात्पुरत्या चौपाटीकुट्या (बीच शॅक्स) आणि तात्पुरत्या राहुटया उभारण्यासाठीच्या अटी व शर्ती :-**

खाजगी मालमत्तेवर कुटया / तंबु / राहुटी उभारण्यासाठी तात्पुरत्या बांधकामांना लागू असणाऱ्या ग्रामपंचायत किंवा नगरपरिषद /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या वैध परवानग्या/ना हरकत प्रमाणपत्र मिळाल्या आहेत या अटींच्या अधीन राहून, पुढील अटी व शर्तीनुसार परवाना देण्यात येईल.

१. सर्व कुटया राहुटया व केंद्रिय पर्यावरण,वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार व पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन, किनारपटटी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA) यांच्याद्वारे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या अधिसुचनांनुसार असावीत.

२. अर्जदाराने यथोचितरित्या भरलेल्या अर्जासोबत पुढील कागदपत्रे सादर करावीत :-

अ) निर्वेध मालकी हक्कासह मालमत्तेच्या मालकीचे दस्तऐवज,नगर पालिका व ग्रामपंचायत यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची जोडपत्र- छ नुसार विहित नमुन्यातील वैध परवानगी.

ब) जागेचा नकाशा.

क) पारपत्र आकारातील अलीकडील तीन रंगीत छायाचित्रे ( दोन प्रतीवर मागील बाजूस नाव लिहिलेले आणि एक अर्जासोबत)

ड) अर्जाचे शुल्क, कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमधून मुंबईत देय असलेल्या पर्यटन संचालनालयाच्या नावे काढलेल्या धनाकर्ष स्वरूपातील रू. ३०००/- एवढी (ना-परतावा रक्कम) असेल.

इ) फी आणि सुरक्षा अनामत पुढीलप्रमाणे असेल.

| कुटी उभारण्याचे क्षेत्र | खासगी क्षेत्रातील कुटीसाठी फी व सुरक्षा अनामत | राहुट्यांसाठी फी | |
|---|---|---|---|
| | | वातानुकूलित राहुटया/ तंबू | बिगर वातानुकूलित राहुट्या / तंबू |
| सर्व खाजगी मालमत्ता | रू १५,०००/- प्रती चौपाटी कुटी. (प्रत्येक पर्यटन हंगामासाठी) प्रत्येक कुटीकरिता रू. २०,०००/- एवढी रक्कम सुरक्षा अनामत असेल. | प्रत्येक राहुटीस प्रत्येक हंगामानुसार रू.१५००/- तसेच प्रती राहूटीमागे रु.१,५००/- एवढी सुरक्षा अनामत रक्कम असेल. | प्रत्येक तंबु / राहुटीमागे प्रत्येक पर्यटक हंगामानुसार रू.७५०/- प्रत्येक राहुटी मागे, तसेच रू. ७५०/- एवढी सुरक्षा अनामत असेल. |

ई) कुटीची फी / राहुटी फी ना- परतावा असून तिचा भरणा धनाकर्षाद्वारेच करावा.

फ) वर नमूद केलेली परतावायोग्य सुरक्षा अनामत अर्जाच्या नमुन्यासोबत पर्यटन संचालनालयामध्ये धनाकार्षाव्दारे भरण्यात येईल. या धोरणाच्या कोणत्याही अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्यास, सुरक्षा अनामत जप्त करण्यात येईल.

३. निवड केलेला वाटपग्राही, पर्यटन मंत्रालय, भारत सरकार यांच्याद्वारे निर्गमित केलेल्या सुरक्षित व जबाबदार पर्यटन धोरणाच्या आचार संहितेशी वचनबध्द असल्याबाबतचे हमीपत्र सादर करील.

४. वाटपग्राहीने समुद्राकिनाऱ्यावरील कोणत्याही साहसी क्रिडा प्रकारामध्ये सहभाग घेऊ नये.

५. वाटपग्राहीने संबंधीत सक्षम प्राधिकरणांकडून प्रचलित अधिनियम, नियम सर्वसाधारण बाबी आणि त्यांच्याशी संबंधीत उपक्रमासाठी योग्य जागा राखून ठेवावी.

पर्यटन संचालनालयास मासेमारी करावयाच्या परिसरात तत्संबंधित प्राधिकरणांकडुन यथोचित “ना हरकत प्रमाणपत्र” प्राप्त झाल्यानंतरच, केवळ त्या क्षेत्रातील उपक्रमांना परवानगी देता येईल. प्रत्यक्ष मासेमारी केली जाते अशा समुद्रकिनाऱ्यावरील जागांच्या ठिकाणी हे धोरण राबविले जाणार नाही याची दक्षता पर्यटन संचालनाय घेईल.

**अडचणी दूर करणे**:

तात्पुरत्या हंगामी संरचनांच्या उभारणीबाबत धोरणाच्या अंमलबजावणीसंबंधात कोणतीही अडचण उद्भवल्यास, पर्यटन विभागाचा निर्णय अंतिम असेल. वाटपग्राहीकडून वरील कोणत्याही अटींचे पालन करण्यात कसूर झाल्यास आणि त्याने चुकीची माहिती सादर केल्यास, परवानगी तात्काळ रद्द करण्यात येईल आणि त्याच्या स्वत: च्या जोखमीवर व स्वखर्चाने कुटी पाडून टाकण्यात येईल. कुटी वाटपग्राहीवर तीन वर्ष एवढया कालावधी साठी बंदी घालण्यात येईल. आणि त्याने फी/ अनामत रक्कम म्हणुन जमा केलेली पर्यटन संचालनायाकडून जप्त करण्यात येईल.

या धोरणा संबंधीत शासकीय विभाग, अभिकरणे किंवा कोणत्याही अन्य संबंधित व्यक्ती यांनी केलेल्या योग्य शिफारशीवरुन या धोरणातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याचे अधिकार महाराष्ट्र शासन पर्यटन विभागाकडे राहतील. वाटपग्राही सुधारीत मंजुरी दिलेल्या अटी व शर्ती अनुसरील.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. वित्त विभाग / साधनसंपत्ती, दि.१२/६/२०२० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२००८१७१५१४१९०५२३ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Valsa R. Nair Singh

Digitally signed by Valsa R. Nair Singh
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d247d5da6bcbfdaa11e2c5849d798d7a4166b9383caae837665a4e85bf1dfb6, serialNumber=6b5f579e0e797ec0d52aa18f6730b8fbe3915a18f04069b941500b4f1ec297cc, cn=Valsa R. Nair Singh
Date: 2020.08.18 16:18:32 +05'30'

**( वल्सा नायर-सिंह )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
३. मा. मंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
४. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२,
५. मा. मुख्य सचिव

६. सर्व मा. विधानसभा सदस्य

७. सर्व मा. विधानपरिषद सदस्य

८. मंत्रालयातील सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव

९. आयुक्त, बृहन्मुंबई, महानगरपालिका.

१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई

११. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई,

१३. महाराष्ट्र सागरी किनारपट्टीक्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण (MCZMA)

१४. अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ

१५. विभागीय आयुक्त, कोकण विभाग

१६. जिल्हाधिकारी, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे,मुंबई शहर, मुंबई उपनगर

१७. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई

१८. पोलीस अधीक्षक, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे

१९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे,मुंबई.

२०. चिफ पोर्ट ऑफिसर, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई,

२१. निवड नस्ती / पर्यटन उपविभाग.